साप्ताहिक

"एकच ध्येय... एकच आवाज"

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक २० वा | सोमवार, दि. ०१/०६/२०२६ ते दि. ०७/०६/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## नवीन वीज उपकेंद्रामुळे बळसाणे परिसर विकासाला मिळणार चालना–पालकमंत्री जयकुमार रावल



## बळसाणे येथे ३३ के.व्ही. नवीन सबस्टेशनचे भूमिपूजन; १२ गावांना होणार लाभ

धुळे (जिमाका) – वीज कंपनीच्या नवीन उपकेंद्रामुळे साक्री तालुक्यातील बळसाणे परिसरातील वीज सुविधा अधिक सक्षम होऊन विकासाला गती मिळणार असून शेती, घरगुती वापर तसेच भविष्यातील औद्योगिक गरजांसाठी मोठी मदत होणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले. साक्री तालुक्यातील बळसाणे (सतमाने फाटा) येथे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या ३३/११ के.व्ही. नवीन उपकेंद्राच्या भूमिपूजन कार्यक्रमात पालकमंत्री श्री.रावल बोलत होते. यावेळी विद्युत विभागाचे अधीक्षक अभियंता सायस दराडे, कार्यकारी अभियंता भाऊसाहेब पाटील, अपर तहसीलदार अधिकार पेंढारकर, दोंडाईचा बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, बळसाणेचे सरपंच ज्ञानेश्वर हालोरे, यांच्यासह लोकप्रतिनिधी, महावितरणचे अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी, ग्रामस्थ व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, वाढत्या वीज मागणीच्या पार्श्वभूमीवर नवीन उपकेंद्रामुळे परिसरातील वीजपुरवठा अधिक सक्षम, सुरळीत व दर्जेदार होणार आहे. सिंचन, शेती, उद्योग, व्यावसायिक तसेच सर्वसामान्य नागरिकांना याचा थेट लाभ मिळेल. तसेच वीज यंत्रणेवरील ताण कमी होऊन भविष्यातील वाढती गरजही पूर्ण करता येणार आहे. शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविण्यासाठी पाणी, वीज आणि शेतीमालाला योग्य भाव या बाबींवर शासनाचा भर आहे. नैसर्गिक संकटांचा सामना करत असताना शाश्वत विकासाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सक्षम करण्याचे काम सुरू आहे. विहिरी, बंधारे, सिंचन सुविधा आणि शेतापर्यंत पाणी पोहोचविण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. परिसरातील वीजपुरवठा मजबूत करण्यासाठी बळसाणे येथे ३३ के.व्ही. उपकेंद्र उभारण्यात येत असून त्यासोबत मुख्य व जोडणी लाईनची कामेही केली जाणार आहेत. या उपकेंद्रामुळे बळसाणे परिसरातील बळसाणे, कढरे, सतमाने, आगरपाडा, दुसाने, इंदवे, हट्टी, ऐचाळे, डोंगराळे तसेच अन्य ३ पाड्यांसह एकूण १२ गावांना लाभ होणार आहे. शेती, घरगुती वापर तसेच आगामी औद्योगिक विकासासाठीही हे उपकेंद्र महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, शिंदखेडा मतदारसंघात ऊर्जा क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामे सुरू आहेत. शिंदखेडा शहरासाठी १३२ के.व्ही.चे मोठे सबस्टेशन उभारण्यात आले असून, शिरपूर येथे २२० के.व्ही. सबस्टेशन दहिवद परिसरातही ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे काम सुरू आहे. धुळे जिल्ह्यात सिंचन, शिक्षण आणि उद्योग क्षेत्राचा विकास व्हावा यासाठी पालकमंत्री म्हणून सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. धुळे जिल्हा सोलर हब म्हणून विकसित होत असताना येथील सौरऊर्जेचा लाभ सर्वप्रथम जिल्ह्यातील नागरिकांना मिळावा, यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले. शेतकरी बांधवांना सोलर पंपाची योजना लागू केली असून अनेक शेतकऱ्यांना त्याचा लाभ देण्यात आला. 'कुसुम' योजनेच्या माध्यमातून ठिकठिकाणी सोलरचे हब निर्माण करण्यात येवून सोलर हबच्या माध्यमातून किमान २४ तास शेतकऱ्यांना मिळावी यासाठी शासनामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. धुळे जिल्हा हा भारतात सोलर हब म्हणून विकसित झाला आहे. सोलरची वीज बॅटरीमध्ये स्टोअर करता येईल का यासाठी सरकारच्या माध्यमातून प्रयत्न होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ऊर्जा विभागामार्फत जिल्ह्यात विविध विकासकामांना गती मिळत असून अनेक ठिकाणी नवीन सबस्टेशन व वीज प्रकल्प राबविण्यात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले. सिंचन, शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातही जिल्ह्यात महत्त्वपूर्ण कामे सुरू आहेत, असेही पालकमंत्री श्री. रावल यांनी यावेळी सांगितले. यावेळी दोंडाईचा बाजार समितीचे सभापती नारायण पाटील यांनी मनोगत व्यक्त केले तर अधीक्षक अभियंता श्री. दराडे यांनी प्रास्ताविक केले.

## ई-बसेससाठी चार्जिंग स्टेशनचे जाळे उभारा–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

## 'विकसित महाराष्ट्र' अंतर्गत एसटीचा १०० टक्के ताफा ई-बसेसमध्ये रूपांतरित करण्याचे उद्दिष्ट

मुंबई – 'विकसित महाराष्ट्र अंतर्गत' पर्यंत एसटी महामंडळामध्ये सन २०२९ पर्यंत ५० टक्के, २०३५ पर्यंत ८० टक्के; तर २०४७ पर्यंत एसटीचा १०० टक्के ताफा ई-बसेसमध्ये रूपांतरीत करायचा आहे. या अनुषंगाने बसेससाठी आवश्यक असलेले चार्जिंग स्टेशन उभारण्याच्या कामाला गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा येथील निवासस्थानी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या इ-बसेससंदर्भात बैठक झाली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक (दूरदृश्य प्रणालीद्वारे), मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, अपर मुख्य सचिव संजय सेठी, एसटीचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, उपसचिव चेतन निकम आदी या बैठकीस उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पर्यावरणपूरक ई-बसेस ज्या मार्गावर चालवायच्या आहेत, त्या मार्गाचा कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाने अभ्यास करावा. पुरवठादाराकडून बस प्राप्त होताच त्या बसेसचे पुढील ७ दिवसात निरीक्षण करावे. या बसेसकरिता एक इकोसिस्टिम तयार करावी. ज्या मार्गाने खाजगी बसेस धावतात, त्या मार्गाचाही अभ्यास करून ई-बसेसचा पर्याय तयार ठेवावा. राज्य शासनाच्या विद्यमान ई-वाहन धोरणांतर्गत सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत ई-बसेसचा (पान ४ वर)



आमचे स्नेही मार्गदर्शक महाराष्ट्रातील नामांकीत लेखक तथा उपसंचालक – पर्यटन विभाग महाराष्ट्र राज्य

**डॉ. नंदकुमार राऊत साहेब**

यांना वाढदिवसा निमित्त उदंड अरोग्य सुख समृद्धी व भरभराटीचे जावो हिच आई तुळजा भवानी चरणी प्रार्थना!

शुभेच्छुक *
अनिल धमने पाटील
जिल्हा सचिव – व्हाईस ऑफ मिडिया पत्रकार संघ, नांदेड
संजय कुसळकर – मुख्य संपादक
रजनी कुसळकर – कार्यकारी संपादक
सचिन धायगुडे
पालघर जिल्हाप्रमुख शिवसेना ओबीसी व्हीजेएनटी
आणि सा. प्रजा न्याय परिवार

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर (३१ मे, १७२५ – १३ ऑगस्ट, १७९५, राज्यकालावधी इ.स. १७६७ – इ.स. १७९५) या भारतातील, माळव्याच्या तत्त्वज्ञानी महाराणी म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी नर्मदा तीरी, इंदूरच्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर या ठिकाणी आपली राजधानी हलविली. मल्हाररावांनी त्यांना प्रशासकीय व सैन्याच्या कामात पारंगत केलेल होते. त्या आधाराने अहिल्याबाईंनी इ.स. १७६६ ते इ.स. १७९५ म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत माळव्यावर राज्य केले होते. होळकर यांचा जन्म ३१ मे इ.स. १७२५ रोजी महाराष्ट्राच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी (मल्हारपीठ) खेड्यात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसतानाही त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहिण्यावाचण्यास शिकवले होते. मल्हारराव होळकर पुण्यास जाताना चौंडीस थांबले होते. आख्यायिकेनुसार, ८ वर्षांच्या अहिल्यादेवींना, मल्हाररावांनी एका देवळात बघितले. मुलगी आवडल्यामुळे त्यांनी तिला, स्वतःचा मुलगा खंडेराव याची वधू म्हणून आणले.

मल्हारराव होळकरांच्या त्या सून होत. अहिल्यादेवींचे पती खंडेराव होळकर हे इ.स. १७५४ मध्ये कुम्हेरच्या लढाईत धारातीर्थी पडले. त्यांच्या मृत्यूनंतर सासरे मल्हाररावांनी अहिल्याबाईंना सती जाऊ दिले नाही. १२ वर्षांनंतर, मल्हारराव होळकर हेही मृत्यू पावले. त्यानंतर अहिल्याबाई मराठा साम्राज्याच्या माळवा प्रांताचा कारभार बघू लागल्या. त्या लढाईत अहिल्यादेवी स्वतः सैन्याचे नेतृत्व करीत होत्या. पुढे त्यांनी तुकोजीराव होळकर यांची सेनापती म्हणून नेमणूक केली. इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर, यांना भारताच्या कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गारेट असे म्हणले आहे.१ थोडक्यात अहिल्याबाई यांची तुलना रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गारेट यांच्याशी एकत्रित केली आहे. त्याने म्हणले आहे की ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रीयांचा इतिहास लिहिला जाईल त्या वेळेस पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्व प्रथम लिहिले जाईल.

अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, एवढचं नाही तर त्यानी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण आखल प्रसिद्ध हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यांत द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक, पुरी जगन्नाथ मंदिर व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने ध्वस्त केलेले देऊळ बघून अहिल्यादेवींनी शेजारीच एक शंकराचे एक देऊळ बांधले. सोमनाथला जाणारे लोक या देवळालाही भेट देतात. अहिल्याबाईंना प्रजेस कल्याणकारी असे काम करण्याची आवड होती. इ.स. १७६५ मध्ये सत्तेसाठी झालेल्या एका लढाईदरम्यान लिहिलेल्या एका पत्रावरून मल्हाररावांचा अहिल्याबाईंच्या कर्तृत्वावर किती विश्वास होता हे दिसून येते. चंबळ पार करून ग्वाल्हेर येथे जावा. तेथे तुम्ही ४–५ दिवस मुकाम करू शकता.तुम्ही मोठे सैन्य ठेवू शकता व त्यांचे शस्त्रांसाठी योग्य तजवीज करा.....कूच करतांना,मार्गावर तुम्ही सुरक्षेसाठी चौक्या लावा. पूर्वीच शासक म्हणून प्रशिक्षित असल्यामुळे मल्हारराव व खंडेराव यांच्या मृत्यूनंतर अहिल्यादेवींनी स्वतःलाच राज्यकारभार पाहू देण्याची अनुज्ञा मिळण्यासाठी पेशव्यांना विनंती केली. त्यांनी शासन करण्यास माळव्यात अनेकांचा विरोध होता, पण होळकरांचे सैन्य अहिल्याबाईंच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते. पेशव्यांनी परवानगी दिल्यावर त्यांनी आपल्याला विरोध करणाऱ्यांना चाकरीत घेतले व तुकोजीराव होळकर (मल्हाररावांचा दत्तक पुत्र) यास सेनापतीपद देउन अहिल्यादेवी होळकरांनी माळव्यास प्रयाण केले.

अहिल्यादेवींनी पडदा प्रथा कधीच पाळली नाही. त्या रोज जनतेचा दरबार भरवीत असत व लोकांची गाऱ्हाणी ऐकण्यास नेहमीच उपलब्ध असत. जरी राज्याची राजधानी ही नर्मदातीरावर असलेल्या महेश्वर येथे होती तरीही, इंदूर या खेड्याचा विकास करून त्याचे सुंदर मोठ्या शहरात रूपांतर करणे, हे अहिल्यादेवींनी केलेले फार मोठे काम होते. त्यांनी माळव्यात रस्ते व किल्ले बांधले, अनेक उत्सव भरवले, हिंदूमंदिरांमध्ये कायमस्वरूपी पूजा सुरू रहावी म्हणून अनेक दाने दिली. माळव्याबाहेरही त्यांनी मंदिरे, घाट, विहिरी, तलाव व धर्मशाळा बांधल्या. भारतीय संस्कृती कोशात अहिल्यादेवी होळकरांनी केलेल्या बांधकामांची यादी आहे – काशी, गया, सोमनाथ,अयोध्या, मथुरा, हरिद्वार, कांची, अवंती, द्वारका, बद्रीकेदार, रामेश्वर व जगन्नाथपुरी वगैरे. अहिल्यादेवींस, सावकार, व्यापारी, शेतकरी इत्यादी आर्थिकदृष्ट्या सुदृढ झालेले बघून आनंद होत असे. परंतु त्यांनी त्यांच्यावर आपला अधिकार असल्याचे कधीच जाणवू दिले नाही. त्यांनी सर्व राज्यकारभार हा सुखी व धनाढ्य लोकांकडून नियमांतर्गत मिळालेल्या धनापासून चालविला होता, असे दिसते.

अहिल्यादेवींनी जनतेच्या/रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. अहिल्यादेवींच्या राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊ शकत असे. एकदा त्यांच्या एका मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक घेण्याच्या मंजुरीस नकार दिला, तेव्हा अहिल्यादेवींनी दत्तकविधानाचा कार्यक्रम स्वतः प्रायोजित करून, रीतसर कपडे व दागिन्यांचा आहेर दिला. अहिल्यादेवी होळकरांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून, सन १९९६ मध्ये, इंदुरातील नागरिकांनी त्यांच्या नावाने एक पुरस्कार सुरू केला. तो, दरवर्षी, जनसेवेचे विशेष काम करणाऱ्यास दिला जातो. भारताच्या पंतप्रधानांनी पहिल्या वर्षी तो पुरस्कार नानाजी देशमुखांना दिला. अहिल्याबाई होळकर यांच्या स्मरणार्थ, इंदूर येथील विश्वविद्यालयास त्यांचे नाव दिले आहे. तसेच त्यांचे नावाचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ हे एक विद्यापीठ सोलापूरला आहे.

भिल्ल व गोंड या राज्याच्या सीमेवर असलेल्या जमातींमधील वाद अहिल्यादेवी सोडवू शकल्या नाहीत. तरीही, त्यांनी त्या लोकांना पहाडातील निरुपयोगी जमीन दिली आणि त्यांना, त्या क्षेत्रातून जाणाऱ्या सामानावर थोडा 'कर' घेण्याचा अधिकार दिला. यासाठी रायगंण सुभ्यावर नवापुर या ठिकाणी ठिंगळे भिल्ल सरदार यांना अधिकार दिले त्यामुळे भिल्ल जमाती होळकराच्या सैन्यात आले व त्यांनी सुरते वर वचक बसवला. याही बाबतीत, (आंग्ल लेखक) 'माल्कम' यांच्यानुसार, अहिल्यादेवींनी' त्यांच्या सर्वयींवर लक्ष ठेवले'. महेश्वर येथील अहिल्यादेवींची राजधानी ही जणू काव्य, संगीत, कला व उद्योग यांची संस्थाच होती. महाराष्ट्रातील प्रसिद्ध मराठी कवी मोरोपंत व शाहीर अनंतफंदी यांना व संस्कृत विद्वान खुशालीराम यांना अहिल्याबाईंनी आश्रय दिला. कारागरांना, मूर्तिकारांना व कलाकारांना त्यांच्या राजधानीत सन्मान व वेतन मिळत असे. त्यांनी महेश्वर शहरात एक कपड्याची गिरणीपण सुरू केली.

एकोणीसाव्या व विसाव्या शतकातील भारतीय, इंग्रजी व अमेरिकन इतिहासकार हे मान्य करतात की, अहिल्यादेवी होळकरांस माळवा व महाराष्ट्रात, त्या काळी व आताही, संताचा सन्मान दिला जातो. इतिहासाच्या कोणाही अभ्यासकास ते मत खोडून काढण्याजोगे आजवर काहीही सापडलेले नाही. राजकारणातील बारकावे व तत्त्व व्यावहारिक नीती नियम व सूत्रे आपल्या देशाची राजकीय, सामाजिक, भौगोलिक स्थिती, रणांगणावरील आखाडे व अडचणी आणि बारकावे समजून घेतले. मल्हारराव यांच्या गैरहजेरीत सर्व कारभार करण्यात त्या पारंगत झाल्या. ज्या काळी दळणवळणाची साधने फारच कमी होती किंवा म्हटले तर नव्हती अशी परस्थिती होती अश्या खडतर काळात त्यांनी भारतातील तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी व राज्यात मंदिरे धर्मशाळा तलाव, विहिरी, पाणपोई, घाट अशी अनेक समाज उपयोगी कामे केली. आज ही वास्तुशिल्पे व त्यांनी उभारलेली स्थापत्य कला मातोश्रीच्या भव्य कार्याची साक्ष देत उभी आहेत. वास्तुशिल्प व बांधकाम केल्यामुळे कारागिरांची कला जोपासून संकृतीचा वारसा तर जपलाच पण त्याच बरोबर गोरगरीब जनतेच्या हाताला काम मिळवून दिले. त्यांच्या कामगिरीचा हा दुहेरी बाणा निश्चीतच अभिमानास्पद आहे

ज्या प्रमाणे आहिल्यादेवी लोककल्यान आणि समाज सुधारना करीत त्याच प्रमाने लोकांमधे समानता अनन्याच काम करीत आहिल्यादेवी नी आपल्या सेन्या मध्ये पुरुषा ना संधी देत त्याच प्रमाणे महिला नाही संधी मिळत आणि म्हणुनच आहिल्यादेवी नी सेन्या मध्ये महिला ची ही एक मोठी तुकडी खास सामावुन घेतली आणि म्हणुनच आहिल्यादेवी ना समान न्याय करनार्या न्यायदेवता म्हनुन आहिल्यादेवीना ओळखल जातं. शेतकरी सुखी तर जग सुखी या संकल्पनेतून शेतकऱ्यांच्या जाचक करातून मुक्त केले. अनेक ठिकाणी तलाव व विहिरी बांधल्या. शेतकऱ्यांना गोपालनाचे महत्त्व पटवून प्रजेला गाई देऊन मोठ्या प्रमाणात गोपालन घडवून आणले.

मातोश्रीची लोककल्याणाची कीर्ती ख्याती ऐकुन अनेक विद्वन लोक त्यांची भेट घेण्यास येत असत आणि नंतर त्या ठिकाणीच राहत असत. अनेक विषयाचे विद्वान, शास्त्री पंडीत, व्याकरणकार, कीर्तनकार, ज्योतिषी, पुजारी, वैद्य, हकीम यानाही त्या मुद्दाम बोलावून घेऊन त्यांना त्या राजाश्रय देत असत. महेश्वर नगरीत वास्तव करीत होते म्हणूनच महेश्वर नगरी त्याकाळी संस्कृती विद्वान व धर्माचे माहेरघर म्हणून नावारूपाला आली होती . ग्रंथ संपदा– निर्मिती छापखाने नसल्याने त्या काळी धर्माचे तत्त्वज्ञान जाणून घेण्याकरिता हस्तलिखिते यावरच अवलंबून राहावे लागत होते. हस्तलिखिते लिहिणारे मोठ्या प्रमाणात रकमेची मागणी करत असत. ज्या प्रमाणे हिरा व रत्ने पारखणाऱ्या जवाहिऱ्याप्रमाणे त्या विद्द्येची महत्त्व जाणत असल्याने त्याच्या मागणीप्रमाणे रक्कम देऊन ग्रंथाची हस्तलिखिते तयार करून विद्वान विद्यार्थ्यांसाठी अनमोल ग्रंथसंपदा निर्माण करून जतन केली. शाळा काढून विद्याप्रसाराचे काम केले. या काळात सती जाण्याची मोठी रूढी व परंपरा होती. सती गेल्याने पुण्य व न गेल्याने पाप असा समज समाजात रूढ होता. रामायण आणि महाभारत यामध्ये अनेक युद्ध होऊनही कोणी सती गेल्याचा उल्लेख नाहीत असे अनेक दाखले देऊन सती प्रथेला शास्त्राचा आधार नाही हे प्रजेला पटवून दिले. कालांतराने १८२९ साली राजाराम मोहन रॉय यांचा प्रयत्नामुळे सतीची अनिष्ट चाल कायद्याने बंद करण्यात आली यावरून अहिल्याबाई होळकर यांच्या दूरदृष्टेची प्रचीती आपणास यते.

त्या काळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना व प्रजेची चोर दरोडेखोर व भिल्ल लुटमार करीत असत अशा लुटारू लोकांना ठिंगळे सरदारांमार्फत सैन्यात सामील करून पाळीव पशु व गायी, म्हशी आणि शेत जमीनी दिल्या व त्यांचे मत परिवर्तन केले व ते लोक शेती करू लागले त्यामुळे त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटला. भिल्ल लोकांना भिलकवाडी कर घेण्याची परवानगी दिली. एवढे करूनही प्रजेला त्रस्त करणाऱ्या या लोकांना त्यांनी तोफेच्या तोंडी देऊन एक प्रकारचा दरारा नर्माण केला. अहिल्याबाई होळकर यांच्या न्यायप्रियतेची ख्याती सर्व दूर पसरली होती. सर्वांना समान न्याय हा त्यांचा बाणा होता. त्यांच्या संस्थानचा सुभेदार तुकोजी होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणून त्याला तुरुंगात डांबले. तर अहिल्यादेवी च्या सर्वांना समान न्याय या विचाराने डॉ .बाबासाहेब आंबेडकर हे सुद्धा प्रभावित होते महेश्वर येथे संस्कृत पाठशाळा सुरू केली. अन्नछत्रे घातली. अनेक ठिकाणी मंदिरे बांधली. गुजराथेतील सोरटी सोमनाथाच्या मंदिराचा जिर्णोद्धार केला. असे पुण्यसंचयाचे काम अहिल्यादेवी करीत होत्या. तशातच त्यांचा नातू तेराव्या वर्षी मरण पावला. काही दिवसातच जावई लढाईत कामी आला आणि मुलगीही सती गेली. आयुष्यभर कोसळलेल्या संकटांनी त्यांचा अंत पाहिला होता. त्यांची प्रकृती बिघडत गेली आणि अखेर १३ ऑगस्ट १७९५ रोजी त्यांनी शांतपणे मृत्यूला जवळ केले.

अहिल्यादेवी एक अतिशय योग्य शासक व संघटक होत्या. मध्य भारताच्या इंदूरमधील त्याचा राज्यकाळ सुमारे तीस वर्षे चालला. हा एक स्वप्नवत काळ होता. या काळात कायद्याचे राज्य होते आणि त्यामुळे त्या काळात जनतेची भरभराट झाली. अहिल्यादेवी होळकरांना जीवनकालात तर सन्मान मिळालाच पण मृत्यूनंतरही लोकांनी त्यांना संताचा दर्जा दिला. ज्याप्रमाणे शिवाजी महाराज हे जसे पुरुषांमधले उत्तम राजे होते, तसेच अहिल्यादेवी ही स्त्रियांमधील उत्तम राज्यकर्ती होती. तिच्या चांगल्या बुद्धीचे, चांगुलपणाचे व गुणांचे उदाहरण देता येऊ शकते. अशी अहिल्यादेवी ही एक महान स्त्री होती. आपल्या असामान्य कर्तृत्वाने अहिल्यादेवींनी रयतेचे मन जिंकले. नाना फडणवीसांसकट अनेक उच्च धुरीण आणि माळव्यातील लोकांनुसार ती एक दिव्य अवतार होती. ती आजतागायतची सर्वांत शुद्ध व उदाहरण देण्याजोगी शासक होती. अलीकडच्या काळातील चरित्रकार अहिल्यादेवींना 'तत्त्वज्ञानी राणी' असे संबोधतात. याचा संदर्भ बहुतेक 'तत्त्वज्ञानी राजा' भोज याच्याशी असावा. अहिल्यादेवी होळकर ह्या एक खरोखरीच विस्तृत राजकीय दृश्यपटलाच्या एक सूक्ष्म अवलोकनकर्त्या होत्या. सन १७७२ मध्ये पेशव्यांना लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी ब्रिटिशांबरोबर हातमिळवणी करण्याबाबत एक ताकीद दिली होती. त्यांना कवटाळणे हे अस्वलास कवटाळण्याजोगे असल्याचे त्यांनी नोंदले आहे : वाघासारखे इतर प्राणी हे शक्ती वा युक्तीने मारले जाऊ शकतात, परंतु अस्वल मारणे हे फारच कठीण असते. सरळ त्याच्या चेहऱ्यावर वार केल्यासच ते मरते. एकदा त्याच्या मजबूत पकडीत सापडल्यावर ते त्याच्या शिकारीस, गुदगुल्या करून ठार मारते. असाच इंग्रजांचा मार्ग आहे. हे बघता, त्यांच्यावर मात करणे कठीण आहे. या इंदूरमधील शासकांनी, त्यांच्या अखत्यारीत असलेल्या सर्वांस चांगले काम करण्यास प्रोत्साहन दिले. व्यापाऱ्यांनी चांगल्या कपड्यांचे उत्पादन केले, व्यापार वाढला, शेतकरी हे शांततेत व दबावरहित होते. कोणतेही प्रकरण राणीच्या निदर्शनास आले की ते कडकपणे हाताळले जाई. अहिल्यादेवीना आपल्या प्रजेचा उत्कर्ष आवडत असे. तसेच ती प्रजा राजा हिसकावून घेईल म्हणून आपली संपत्ती उघड करण्यास घाबरत नाही, हे बघणे आवडत असे. दूरदूरपर्यंत, रस्त्यांच्या कडेला, दाट छायादार वृक्ष लावण्यात आले होते, विहिरी केल्या होत्या, पथिकांसाठी विश्रांतीगृहे. गरीब, घर नसलेले व अनाथ या सर्वांना त्यांच्या जरुरीनुसार, सर्व मिळत होते. बहुत काळापासून, भिल्ल लोक पहाडांतून सामानाची नेआण करत असतांना लूटमार करीत असत. अहिल्याबाईंनी भिल्ल लोकांना त्यापासून मुक्ती मिळवून दिली व प्रामाणिकपणे शेती करण्याची संधी त्यांना देऊ केली. सर्व समाजाला अहिल्यादेवी आवडत असत आणि तो त्यांच्या उदंड आयुष्याची प्रार्थना करी. त्यांच्या कन्येने तिचा पती, यशवंतराव फानसे यांच्या मृत्यूनंतर सती जाणे हे अहिल्यादेवींच्या आयुष्यातले शेवटचे सर्वात मोठे दुःख होते.

# जागतिक महासंकटाचा फटका महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेला

मागील काही वर्षे पाहता या वर्षी सर्वाधिक उष्ण वर्षाचा विक्रम मोडीत निघण्याची शक्यता आहे. तसेच जगभरातील वातावरणावर विपरीत परिणाम करणाऱ्या शक्तिशाली 'अल निनो'चा प्रभाव २०२८ पर्यंत राहू शकतो, अशी भीतीही अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. भारतात तर परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे, कारण सध्या प्रशांत महासागरात सक्रिय होत असलेल्या शक्तिशाली 'अल निनो' च्या प्रभावामुळे देशातील एकूण पावसाचे प्रमाण दीर्घकालीन सरासरीच्या केवळ ९० टक्के राहण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. जून महिन्यातच हा प्रभाव वाढणार असल्याने पेरणीच्या मुख्य काळातच पावसाची मोठी ओढ निर्माण होऊन शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट कोसळण्याची शक्यता आहे.

गतकाळातील शेती ही निसर्गाच्या एका ठरावीक, अंदाज लावता येण्याजोग्या चक्रावर अवलंबून होती; परंतु आता पारंपरिक पिकांचे वेळापत्रक पूर्णतः कोलमडले आहे. तापमानातील किरकोळ वाढदेखील पिकांवरील रोगराई वाढविण्यास, कीड नियंत्रण कठीण करण्यास आणि जमिनीची नैसर्गिक सुपीकता नष्ट करण्यास कारणीभूत ठरत आहे. हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी आता अतिशय कमी कालावधी शिल्लक आहे. पारंपरिक शेती पद्धती तातडीने बदलून हवामान-अनुकूल बियाण्यांचा वापर करणे, झाडे लावणे आणि ती जगविणे, पाण्याचा थेंब अन् थेंब जपून वापरण्यासाठी ठिबक सिंचनाचा अवलंब करणे आणि हरित ऊर्जेकडे वळणे हाच आता आपल्यासमोरील एकमेव पर्याय उरला आहे; अन्यथा निसर्गाच्या या बदलत्या वृत्ताचा मानवाची अन्नसुरक्षा आणि अस्तित्व धोक्यात येण्यास वेळ लागणार नाही. त्यामळे पन्हा नैसर्गिक जगणे शिकावे लागणार आहे.

त्यातच भारतासह जागतिक महासंकटाचा थेट फटका महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसणार आहे. त्यामुळे अगोदरच आर्थिक संकटात असलेल्या विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे काय? मध्य महाराष्ट्रासह मराठवाड्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस असेल, तर पश्चिम विदर्भात पावसाची तूट सर्वाधिक राहण्याची शक्यता आहे. या दुष्काळी परिस्थितीमुळे भूजल पातळी खालावून पिण्याच्या पाण्याचा आणि सिंचनाचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे कापूस, धान, सोयाबीन आणि संत्र्यासारखी नगदी पिके धोक्यात येतील. १९७१ ते २०२० या कालावधीतील देशाची मान्सून हंगामात पावसाची सरासरी ८७ सेंटीमीटर आहे. त्याच्या तुलनेत यंदा पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र-गुजरातच्या किनारपट्टी भागात मोठे पर्यावरणीय बदल सुरू झाले आहेत. मुंबई आणि उपनगरांमध्ये उन्हाळ्यातील कमाल तापमानात वाढ होत असून मुसळधार पावसाचे दिवस सहा दिवसांनी वाढण्याचा अंदाज आहे. शेतीच नव्हे, तर किनारपट्टीवरील पारंपरिक उपजीविकाही विस्कळीत होणार आहे.

**विशेष लेख...**

वाढत्या उष्णतेमुळे केवळ बर्फ वितळत नसून मानवी संस्कृतीचा पाया असलेल्या शेतीक्षेत्राला आणि अन्नदात्याला त्याचा थेट आणि सर्वांत गंभीर फटका बसत आहेत. कोळसा, तेल आणि वायूच्या अनिर्बंध वापरामुळे हरित उत्सर्जनाचा विळखा आता पृथ्वीभोवती घट्ट होत चालला आहे. त्यामुळे आगामी काळात मान्सूनचे अर्थकारण पूर्णतः कोलमडण्याची शक्यता आहे.

जग आजवरच्या सर्वाधिक उष्ण वर्षांचा विक्रम मोडीत काढू शकते, ज्यामुळे ॲमेझॉनच्या जंगलांमधील भीषण वणव्यांपासून ते थेट भारत आणि युरोपमधील जीवघेण्या उष्णतेच्या लाटांपर्यंत सर्वत्र हाहाकार माजेल. वादळे, ढगफुटी आणि अवकाळी पाऊस यांसारख्या बदलांमुळे प्रत्येक देशाला मोठी आर्थिक आणि मानवी किंमत मोजावी लागत आहे.

गेल्या काही वर्षात मानवाने ३० टक्के जंगलावर कुऱ्हाड चालवली. भारतातही केवळ २२ ते २४ टक्के जंगल राहिले आहे. जंगलाचा आणि श्वासाचा थेट संबंध आहे. जंगलच राहिले नाही, तर तापमान आणि जलचक्र कसे चालणार? जगभरात हवामान बदलावर परिषदा होतात, चर्चा होते; पण उत्तर काय ? निसर्गाचे भरून न निघणारे नुकसान मानवी अस्तित्वाला अधोगतीकडे घेऊन जाणार आहे. कारण आपण निसर्गपूजक नव्हे, तर हासाच्या काळाला गवसणी घालत जगत आहोत. त्यामुळेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या एका अहवालात पुढच्या पाच वर्षांत सूर्य विक्रमी आग ओकणार असल्याचा इशारा देणे, भारतात 'अल निनो' मुळे पावसाचे प्रमाण सरासरीच्या केवळ कमी राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज किंवा महाराष्ट्र-गुजरातच्या किनारपट्टीच्या भागातील पर्यावरण बदलाचा काळ हा महासंकटाचे संकेत आहेत.

गतकाळातील शेतीचे संदर्भबदलले आहे. अर्थात जागतिक पर्यावरण अभूतपूर्व वळणावर येऊन ठेपले की, माणसाजवळ कोणतेही उपाय राहणार नाही. प्रत्येकाला प्रगतीचा अधिकार आहे. निसर्गाने तो नैसर्गिकरीत्या दिला आहे; परंतु निसर्गाला उद्ध्वस्त करून मानवाने विकासाचे टप्पे ओलांडले नाही काय ? जगाला ३३ टक्के जंगलाची गरज आहे. वास्तवात ते ३१ टक्के शिल्लक आहे. या असंतुलनामुळे तापमान हळूहळू वाढत आहे. महापूर येत आहे. दुष्काळी परिस्थिती निर्माण होत आहे. अस्मानी आणि सुलतानी संकट कायम पाचवीलाच पुजलेले आहे. लोकसंख्या वाढली. शहरे फुगली. नद्या कोरड्या पडत चालल्या आहेत.

या निसर्गाच्या हानीमुळे मानवाने का काळ आपल्या स्वतःवर ओढून घेतला आहे. ही आपत्ती लाखो लोकांच्या मृत्यूचे कारण ठरणार आहे. उपासमार, रोजगार, आर्थिक-सामाजिक अधोगती, भविष्यकालीन धोके निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. जर मानवाने हे धोके ओळखून स्वतःला सुधारू शकला नाही तर मानवाचे भविष्य हे पुढे अंधःकारमय होऊ शकते.

# लोकमाता अहिल्यादेवींचा वारसा कृतीतून जपणे हीच खरी आदरांजली-आ.सत्यजीत तांबे

## चाळीसगावमध्ये अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंतीनिमित्त भव्य बाईक रॅली; पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन



चाळीसगाव - लोकमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त चाळीसगाव येथे आयोजित भव्य बाईक रॅलीत आमदार सत्यजीत तांबे यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी आमदार तांबे यांनी अहिल्यादेवींच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. लोककल्याणकारी राज्यकारभार, न्यायप्रियता, सुशासन आणि समाजसेवेच्या माध्यमातून अहिल्यादेवींनी उभा केलेला आदर्श आजही प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या कार्यातून समाजहिताला सर्वोच्च प्राधान्य देत जनतेच्या कल्याणासाठी आयुष्य समर्पित केले. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा केवळ स्मरणात न ठेवता तो प्रत्यक्ष कृतीतून जपणे आणि समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे मत आ. तांबे यांनी यावेळी व्यक्त केले. या भव्य बाईक रॅलीत मोठ्या संख्येने युवक, नागरिक आणि अहिल्यादेवींचे अनुयायी सहभागी झाले होते. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या रॅलीमुळे चाळीसगाव शहरात जयंती उत्सवाला विशेष रंगत प्राप्त झाली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्ताने आज धुळे महानगरपालिका सभागृहात पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्याप्रसंगी महापौर सौ मायादेवी परदेशी उपमहापौर सौ जोशनाताई पाटील माजी महापौर सौजयश्रीताई अहिरराव सौ प्रतिभाताई चौधरी स्थायी समिती सभापती सौ लताताई पोतदार महिला बालकल्याण सभापती सौ उज्वला ठाकरे नगरसेविका सौ वैभवी दुसाने सौ प्रभावती शिंदे सामाजिक कार्यकर्ते महादू भैया परदेशी प्रफुल्ल पाटील अमित दुसाने शिवाजीराव चौधरी पंकज सूर्यवंशी नंदू सोनवणे दीपक गायकवाड आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते

## मिनी ऑईल मिल / एक्सपेलर अनुदानासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

धुळे (जिमाका) - कृषि विभागामार्फत धुळे जिल्ह्यात राष्ट्रीय खाद्य तेल अभियान - तेलबिया योजना २०२६-२७ अंतर्गत फ्लेक्झी फंड योजनेंतर्गत मिनी ऑईल मिल/एक्सपेलर (फिल्टर प्रेससह व फिल्टर प्रेसशिवाय) स्थापनेसाठी इच्छुक वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक संस्था व कंपन्यांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी सुरज जगताप यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. ही योजना बँक कर्जाशी निगडीत असून इच्छुक अर्जदारांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मान्यताप्राप्त वित्तीय संस्थेमार्फत कर्जासाठी प्रकल्प प्रस्ताव सादर करावा. संबंधित बँकेकडून कर्ज मंजूर झाल्यानंतरच अर्जदार अनुदानासाठी पात्र ठरणार आहे. अनुदानाची मर्यादा - १) मिनी ऑईल मिल / एक्सपेलर - फिल्टर प्रेससह : उच्चतम अनुदान मर्यादा : प्रति युनिट ४ लाख रुपये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, सिमांत शेतकरी व महिला प्रवर्ग : युनिट किंमतीच्या ५० टक्के किंवा निर्धारित कमाल मर्यादेपर्यंत अनुदान. सर्वसाधारण प्रवर्ग : युनिट किंमतीच्या ४० टक्के किंवा निर्धारित कमाल मर्यादेपर्यंत अनुदान २) मिनी ऑईल मिल / एक्सपेलर - फिल्टर प्रेस शिवाय : उच्चतम अनुदान मर्यादा : प्रति युनिट ३ लाख रुपये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, सिमांत शेतकरी व महिला प्रवर्ग : युनिट किंमतीच्या ५० टक्के किंवा निर्धारित कमाल मर्यादेपर्यंत अनुदान सर्वसाधारण प्रवर्ग : युनिट किंमतीच्या ४० टक्के किंवा निर्धारित कमाल मर्यादेपर्यंत अनुदान धुळे जिल्ह्यातील इच्छुक शेतकरी, शेतकरी उत्पादक संस्था व कंपन्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. जगताप यांनी केले आहे.

## धुळे जिल्ह्यात १४ जूनपर्यंत प्रतिबंधात्मक मनाई आदेश

धुळे (जिमाका) - धुळे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबादीत राखण्यासाठी ३१ मे, २०२६ ते १४ जून, २०२६ या कालावधीत प्रतिबंधात्मक मनाई आदेश मुंबई पोलिस कायदा कलम ३७ (१) (३) अन्वये लागू राहतील, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी महादेव खेडकर यांनी दिले आहेत.

सदरचे आदेश पाच पेक्षा जास्त व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही मंडळीस (जमावास) किंवा मिरवणूकीस मनाई करील. या कालावधीत सभा, मिरवणूका, मोर्चा, मिटींग कार्यक्रम व रॅली इत्यादी परवानगीबाबत स्थानिक पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी कायदा व सुव्यवस्था राखणेबाबत योग्य तो निर्णय घेऊन परवानगी द्यावी. तसेच लग्नकार्य किंवा प्रेतयात्रेच्या जमावास शासनाने वेळोवेळी दिलेले निर्बंध लागू असतील. हा आदेश ३१ मे, २०२६ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते १४ जून, २०२६ रोजीच्या रात्री २३.५५ वाजेपर्यंत लागू राहील. असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## सुमन कल्याणपूर यांच्या निधनाने संगीत जगतातील देव्हारा रिकामा-राज्यपाल जिष्णु देव वर्मा

मुंबई- महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी ज्येष्ठ गायिका सुमन कल्याणपूर यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले आहे. राज्यपालांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे की, प्रसिद्ध गायिका पद्मभूषण सुमन कल्याणपूर यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुखद आहे. सुमन कल्याणपूर यांच्या गाण्यात माधुर्य होते, तरल भाव होता व पावित्र्य होते. त्यांनी गायलेले प्रत्येक गीत थेट हृदयाला भिडणारे होते. त्यांच्या निधनाने संगीत जगतातील पवित्र देव्हारा रिकामा झाला आहे, अशीच सर्वांची भावना आहे. सुमन कल्याणपूर यांचे संगीत अजरामर आहे. राज्यातील जनतेच्या; तसेच संगीत रसिकांच्या वतीने मी दिवंगत सुमन कल्याणपूर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

# इंधन बचतीचा अनोखा धुळे पॅटर्न देशभरात ठरेल कौतुकास्पद–आ. अनुप अग्रवाल

## पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद; धुळ्यातील भाजपचे ६० नगरसेवक होणार ई–बाईकवर स्वार





धुळे– जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या इंधन संकटाच्या पार्श्वभूमीवर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इंधन बचतीसाठी काटकसर आणि आर्थिक स्वावलंबनाविषयी आवाहन केले होते. त्यानुसार धुळे महापालिकेतील भारतीय जनता पक्षाच्या सर्व नगरसेवकांसह पदाधिकाऱ्यांनी स्वखर्चाने इलेक्ट्रिक बाईक खरेदी करून त्यांचा वापर करावा, अशी माझी इच्छा होती. त्या इच्छेला मान देत भाजपच्या सर्व नगरसेवकांसह पदाधिकाऱ्यांनी एकाच वेळी ६० इलेक्ट्रिक बाईक खरेदी केल्या. सर्व नगरसेवकांनी सकारात्मक आणि ऐतिहासिक प्रतिसाद दिल्याने इंधन बचतीचा हा धुळे पॅटर्न देशभरात कौतुकास्पद ठरेल, असा विश्वास शहराचे आमदार अनुपभय्या अग्रवाल यांनी व्यक्त केला.

पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाचे दर गगनाला भिडले आहेत. यामुळे जगभरात इंधन पुरवठ्याचे संकट उभे राहिले असून, गॅस, पेट्रोल, डिझेल आदी इंधनाच्या पुरवठा साखळीत मोठा अडथळा येत आहे. या परिस्थितीत परकीय चलन साठ्यावरही ताण येत असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना काटकसर आणि आर्थिक स्वावलंबनासाठी सात आवाहने केली होती. पंतप्रधान मोदी यांच्या या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत आमदार अग्रवाल यांच्या नेतृत्वात येथील महापालिकेच्या ६० नगरसेवकांनी इंधनाची बचत करण्यासाठी स्वखर्चाने इलेक्ट्रिक बाईक (ई–बाईक) वापरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आज सायंकाळी जिल्ह्याचे पालकमंत्री



जयकुमार रावल, आमदार अग्रवाल, माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे यांच्या उपस्थितीत चेतक कंपनीच्या शोरूममध्ये या ई–बाईक वितरणाचा कार्यक्रम झाला, त्यावेळी आमदार अग्रवाल बोलत होते. यावेळी महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्स्ना पाटील, स्थायी समितीच्या सभापती लताबाई सोनार, गटनेत्या किरण कुलेवार, महिला व बालकल्याण सभापती उज्वला ठाकरे यांच्यासह पक्षाचे सर्व महिला, पुरुष नगरसेवक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी तडजोड होऊ देणार नाही; सातत्याने पाठपुरावा करणार–आ.सत्यजीत तांबे

## नाशिक विभागातील संस्थाचालकांच्या बैठकीत अनुदानित आश्रमशाळांसमोरील आर्थिक, प्रशासकीय व शैक्षणिक प्रश्नांवर सविस्तर आढावा

शिरपूर– आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी संबंधित प्रश्न अत्यंत संवेदनशील आहेत. अनुदानित आदिवासी आश्रमशाळा अनेक दिवसांपासून विविध अडचणींचा सामना करत आहेत. सरकारची धोरणे आणि निर्णय प्रक्रियेमुळे या शाळांसमोर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर संस्थाचालकांनी मांडलेले प्रश्न येत्या पावसाळी अधिवेशनात शासनासमोर ठामपणे मांडले जातील, असे प्रतिपादन आमदार सत्यजीत तांबे यांनी केले.

धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथे महाराष्ट्र अनुदानित आदिवासी आश्रमशाळा चालक संस्था आयोजित नाशिक विभागातील अनुदानित आदिवासी आश्रमशाळा संस्थाचालकांची बैठक उत्साहात पार पडली. किसान विद्या प्रसारक संस्था, शिरपूर येथे झालेल्या या बैठकीस राज्यभरातील संस्था चालक, पदाधिकारी व शिक्षण क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीस प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार सत्यजीत तांबे यांनी सहभाग घेत आश्रमशाळांसमोरील विविध प्रशासकीय, आर्थिक व शैक्षणिक अडचणी जाणून घेतल्या. शासनाच्या विविध आदेशांमुळे अनुदानित आश्रमशाळा चालविताना येणाऱ्या अडचणी, निधी वितरणातील समस्या, शैक्षणिक गुणवत्तेसाठी आवश्यक सुविधा तसेच संस्थांच्या दैनंदिन कामकाजातील अडथळे यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी त्यांनी आदिवासी मुलांच्या शिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या आश्रमशाळांना सक्षम करण्यासाठी शासनाने सकारात्मक भूमिका घेण्याची आवश्यकता व्यक्त केली. तसेच भविष्यातील शिक्षण व्यवस्थेचा वेध घेण्यासाठी आणि शिक्षण प्रक्रिया अधिक सक्षम करण्यासाठी अशा बैठका महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले.

बैठकीस माजी खासदार बापू चौरे, नाशिक जिल्हाध्यक्ष शिवराम झोले, धुळे जिल्हाध्यक्ष पोपटराव सोनवणे, नंदुरबार सरचिटणीस युवराज पाटील, नागपूर सरचिटणीस राजेंद्र सरोदे, आयोजक तुषार रंधे तसेच डॉ. शशिकांत वाणी यांच्यासह नाशिक विभागातील विविध संस्था प्रमुख उपस्थित होते.

---

(पान १ वरून) मुख्यमंत्री...

वापर वाढविण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. या धोरणानुसार १,५०० ई–बसेसना बसच्या किमतीच्या १० टक्के किंवा कमाल २० लाख रुपये इतके अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. राज्यात पर्यावरणपूरक आणि शाश्वत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था विकसित करण्याच्या उद्देशाने हे धोरण महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सध्या जीसीसी मॉडेलवर ५,१५० ई–बसचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवत आहे. या प्रकल्पामुळे राज्यातील प्रवाशांना आधुनिक, आरामदायी आणि प्रदूषणमुक्त प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.




आमचे स्नेही वडार समाजाचे नेते

**श्री.राजुभाऊ कौतिक सुर्यवंशी**

यांना वाढदिवसाच्या लाख – लाख शुभेच्छा!

आई तुळजाभवानी च्या आशीर्वादाने उदंड आयुष्य लाभो !

..................✻ शुभेच्छुक ✻..................

अनिल धमने पाटील

जिल्हा सचिव – व्हाईस ऑफ मिडिया पत्रकार संघ, नांदेड

संजय कुसळकर – मुख्य संपादक

रजनी कुसळकर – कार्यकारी संपादक

सचिन धायगुडे

पालघर जिल्हाप्रमुख शिवसेना ओबीसी व्हीजेएनटी

आणि सा. प्रजा न्याय परिवार


हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय – घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे – ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर – भ्रमणध्वनी – ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार – ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)

(या वृत्तपत्रातील लिखाणाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)